# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक ०४.०७.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) यशोधरानगर पोलीसांची कामगिरी :— अग्नी शस्त्र व तलवार बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०३.०७.२०२६ चे २१.०० वा. ते २१.५५ वा. चे दरम्यान, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे शहरात कोंबींग ऑपरेशन राबवित असतांना, त्यांनी मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, काजी ऑनलाईन मल्टीसर्व्हीसेस यशोधरानगर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी अब्दुल समीर अब्दुल सादीक, वय ३५ वर्षे, रा. प्लॉट नं. ८, छबीना सोसायटी, वांजरा, भिलगांव रोड, यशोधरानगर, नागपुर हा त्याचे ताब्यात देशी बनावटीचे ०१ अग्नीशस्त्र पिस्तुल तसेच, एक लोखंडी तलवार बाळगताना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन प्राणघातक अग्नीशस्त्र, तलवार व डिव्हीआर असा एकुण किंमती २७,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने अग्नीशस्त्र पिस्तुल व तलवार बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ३, ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परेदशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. युनुसखान शेख, पोउपनि. निळकंठ नन्नावरे, पोहवा. प्रशांत कोडापे, पोअं. अमोल भेंडेकर व राहुल इंगोले यांनी केली.

**२) सिताबर्डी पोलीसांची कामगिरी :— २४ वर्षापासुन फरार आरोपीस अटक.**

पोलीस ठाणे सिताबर्डी, नागपूर शहर येथे दाखल कलम ३५३ भा.दं.वि. मधील आरोपी नामे संजय मनोहर पेटकर, रा. प्लॉट नं १०/५, यशोधरानगर, कामठी रोड, नागपूर हा गुन्हा केल्याचे मागील २४ वर्षापासुन आपली ओळख लपवुन न्यायालयासमक्ष हजर येत नसल्याने, त्यास मा. तदर्थ जिल्हा न्यायधिश, कोर्ट क्र २, नागपूर यांनी न्यायालय समक्ष हजर राहणे बाबत आदेशीत केले होते. सिताबर्डी पोलीसांनी आरोपी बाबत संपुर्ण माहिती घेवून त्याचा कसोशीने शोध घेतला असता, तो गांव मसेपठार, तह. कळमेश्वर, जि. नागपुर येथे आला असल्याचे खात्रीशीर माहीतीवरून पाळत ठेवुन, सापळा रचुन त्यास दिनांक ०४.०७.२०२६ रोजी ०६.०० वा. ते ०७.०० वा. दरम्यान ताब्यात घेतले. आरोपीस मा. तदर्थ जिल्हा न्यायधिश, कोर्ट क्र २, नागपूर यांचेसमक्ष हजर करण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नागरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेडडी सह. पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अति. पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग), मा.

श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. २), मा. श्री. चंन्द्रशेखर चकाटे सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सुहास राऊत, सफौ. शेखर कभे, पोहवा. देवेंन्द्र डहाके, पोहवा. अमित त्रिपाठी, पोअं. अर्जुन जाधव, शैलेष क्षिरसागर यांनी केली.

**<u>३) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर मालकांविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०४.०७.२०२६ चे ०२.०० वा. ते ०३.०० वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे हद्दीत, हॅमर्स कॅफे ॲण्ड रेस्टॉरेंट, साईनाथ कॉम्प्लेक्स, चौथा माळा, नवा नकाशा, पाचपावली येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे कॅफे मालक आरोपी क्र. १) रंजीत सेवकराम कोचे, वय ३६ वर्ष, रा. ११६, एनआयटी गार्डन जवळ, कपीलनगर, नागपूर २) धिरज महेंद्रकुमार गोलछा, वय ४५ वर्ष, रा. कराची गल्ली, सदर, नागपुर हे त्यांचे इतर ०६ आरोपी वेटरचे मदतीने २२ ग्राहकांना शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आले. आरोपी हे विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखुजन्य हुक्का व ईतर साहित्य असा एकुण १,१६,१५०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कॅफेमालक, वेटर व ग्राहक असे एकूण ३० आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे कलम २७२ भा.न्या.सं सहकलम ४,६,७,२०,२१,२४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम—२००३, महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम—२०१८.अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी नागपूर शहरचे मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, मा. सह. पोलीस आयुक्त श्री. नवीनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) श्रीमती विनिता शाहु, मा. पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३) श्री. राहुल मदने, मा. सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) श्री. शिवप्रसाद पारवे यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. अनिरूध्द पुरी, दुपोनि. विवेक पडघन, पोउपनि. राजेंद्र जाधव, पोहवा. आनंद सिंह व पोअं. राजु श्रीवास यांनी केली.

## (गुन्हे)

**<u>पोलीस ठाणे तहसिल :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी अमित सुरेश पुनयानी, वय ४८ वर्षे, रा. प्लॉट क्र. १३८, ईस्ट वर्धमान नगर, नागपूर हे रेडीमेड कापडाचे व्यापारी असून, अल्फा ॲपरल्स या नावाने तिननल चौक, गांधीबाग, नागपुर येथे त्यांचे कापडाचे दुकान आहे. व्यवसायाच्या निमित्ताने त्यांची ओळख आरोपी राजल मोहीत वेद, वय ५३ वर्ष, रा. प्लॉट नं. ०१, भगत अभिरथी अपार्टमेंट, पन्नासे ले—आऊट, स्वावलंबी नगर, नागपुर याचे सोबत झाली होती. आरोपी याने सुरवातीला फिर्यादीसोबत व्यवहार करून, फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आरोपीवर फिर्यादीचा विश्वास बसल्याने आरोपीने फिर्यादी यांना गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळवुन देण्याचे आमिष दाखवुन, दिनांक १४. ०६.२०२४ ते दि. ११.११..२०२४ चे दरम्यान, फिर्यादीकडून एकूण १६,००,०००/—रू. घेऊन कोणताही नफा मिळवुन न देता, तसेच रक्कम परत मागीतली असता, आरोपीने रक्कम परत न करता, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन त्यांची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. संजय माने ८९९९०५८५४४ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (मिसिंग)

**पोलीस ठाणे धंतोली :–** पोलीस ठाणे धंतोली हद्दीत प्लॉट नं. ४०, दुर्गा सदन, बलराज मार्ग, धंतोली, नागपुर येथे तक्रारदार तसेच, त्यांचे ईतर भावाचे परीवार तसेच मृतक भाऊ नामे सुरेश किंमतराय परसवानी यांचा परीवार राहतो. दिनांक २४.०६.२०२६ चे १८.०० वा. पासुन तक्रारदार यांचे मृतक भावाचे परीवारातील सदस्य १) श्रीमती हर्षा सुरेश परसवानी, वय ५७ वर्षे, **वर्णन** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–५ फुट १ इंच, डोक्याचे केस काळे पांढरे व लांब, भाषा–हिंदी बोलतात.

२) जितेंद्र सुरेश परसवानी, वय ४२ वर्षे, **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ४ इंच, डोक्याचे केस काळे, भाषा–हिंदी बोलतात.

३) सौ. ईशीता जितेंद्र परसवानी, वय ४० वर्षे, **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, उंची–५ फुट ४ इंच, डोक्याचे केस काळे व लांब, भाषा–हिंदी बोलतात.

४) कु. खुशी जितेंद्र परसवानी, वय २१ वर्षे, **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा– मजबुत, उंची–५ फुट, डोक्याचे केस काळे व लांब, भाषा–हिंदी बोलते. ओळख– डोळ्याला नंबरचा चष्मा लावते.

५) कृष्णा जितेंद्र परसवानी, वय १२ वर्षे, **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा–मजबुत, उंची–४ फुट, डोक्याचे केस काळे, भाषा–हिंदी बोलतो.

हे सर्व राहते घरुन कोणाला काही न सांगता कुठेतरी निघून गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाहीत. बेपत्ता आहेत. तक्रारदार शामसुंदर किंमतराय परसवानी, वय ७१ वर्षे यांनी दिनांक २९.०६.२०२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे धंतोली येथे हरविलेबाबत तक्रार नोंदविण्यात आलेली आहे. हरविलेल्या व्यक्तीविषयी कोणतीही माहीती मिळुन आल्यास पोलीस ठाणे धंतोली येथे संपर्क साधावा.


श्रीमती हर्षा


जितेंद्र


सौ. ईशीता


कु. खुशी


कृष्णा

## (ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ०८, नागपुर. | पो.ठाणे कोतवाली अप. क्र. २६३/२०२५ | कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ भा.न्या.सं. | निसार नासिर काकर (शेख), रा. हिंगणा, रायपुर, जि. नागपुर. | १६.०७.२०२६ |

स्वा/—
( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट —१

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील वाहतूक विभाग अंतर्गत परिमंडळामध्ये बऱ्याच कालावधीपासून जमा असलेले विनादाव्याचे (Unclaimed Vehicles) वाहनांची स्क्रॅप म्हणुन विल्हेवाट करण्याकरीता, वाहतूक परिमंडळ लकडगंज येथे जमा असलेले एकुण ११३ दुचाकी वाहनांची महाराष्ट्र शासनाचे दिनांक १८.०६.१९९१ रोजीचे परीपत्रकात नमुद मार्गदर्शक तत्वाचे पालन करून विल्हेवाट करण्यात येणार आहे.

वाहतूक परिमंडळ लकडगंज येथे जमा असलेल्या वाहनांची यादी नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे वेबसाईट https://nagpurpolice-gov-in/Press/Release-html वर अपलोड करण्यात आली असुन, नमुद लिलाव प्रक्रियेत सहभागी होवुन वाहने खरेदी करणारे अधिकृत लायसन्स धारक यांचेकडुन वाहन खरेदीकरिता आवश्यक असलेली निविदा पोलीस निरीक्षक वाहतूक परिमंडळ लकडगंज नागपूर शहर यांना बंद लिंफाप्यामध्ये दिनांक १५.०७.२०२६ रोजी पावेतो सादर करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

## वाहतुक शाखेची प्रेसनोट —२

**दिनांक ०५.०७.२०२६ ते ११.०७.२०२६ पर्यंत खालील दिलेल्या मार्गावर काम सुरू असुन नमुद मार्गावरून वाहतूक वळविण्यात आले आहे ते खालील प्रमाणे आहे.**

**१)** वाहतूक परिमंडळ सिताबर्डी नागपूर शहर हद्दीतील महा. मेट्रो तर्फे मे. YFC & BBG Projects कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) पर्यंत भुयार मार्गाचे बांधकाम सतत ०१ वर्षात करण्यात येणार आहे. सदरच्या मार्गावर व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता नमुद रस्त्यावरील वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडुन इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) ते इन्स्टीट्युट ऑफ सासन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडे जाणारी वाहतुक ही डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक येथुन उजवे वळण घेवुन पुढे महाराजबाग चौकातुन सोयीनुसार जातील किंवा झिरो माईल येथुन डावे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे इन्स्टीट्युट ऑफ सायन्स चौकाकडे जातील.

**इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- इन्स्टीट्युट ऑफ सायन्स कॉलेज (डी.पी.रोड) कडुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक)कडे जाणारी वाहतुक महाराजबाग चौकातुन डावे वळण घेवुन व्हेरायटी चौक मार्गे फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज

चौक) कडे जातील किंवा बोर्ड ऑफिस चौक येथुन उजवे वळण घेवुन फॉरेस्ट ऑफिस मार्गे झिरो माईल येथुन उजवे वळण घेवुन फ्रिडम पार्क मेट्रो स्टेशन (मॉरेस कॉलेज चौक) चौकाकडे जातील

**सदर अधिसुचना दिनांक ०४.०७.२०२६ रोजीपासून ते दि. ०३.०८.२०२६ रोजीपर्यत अंमलात राहील.**

**२)** वाहतूक परिमंडळ लकडगंज अंतर्गत भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण तर्फे एन.सी.सी लिमीटेड नागपूर कडुन पाचपावली पोलीस ठाणे ते कमाल चौक पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यात येणार आहे. करीता नमुद कामादरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये तसेच, रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, त्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे त्यावर प्रतिबंध व्हावा करीता यादरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**पोलीस ठाणे पांचपावली ते कमाल चौक कडे जाणारी संपूर्ण वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- **पोलीस ठाणे पांचपावली कडुन कमाल चौक कडे जाणारी संपूर्ण वाहतूक सिंधु महाविद्यालय समोरून डावे वळण घेवुन कमाल टॉकीज वॉल कम्पाउंड कडुन डावे वळण घेवुन सरळ कमाल चौक कडे सोईनुसार जातील.**

**सदर अधिसूचना दिनांक १४.०६.२०२६ ते दिनांक १३.०७.२०२६ पर्यत अंमलात राहील.**

**३)** वाहतूक परिमंडळ एम.आय.डी.सी. हद्दीत महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे कल्पतरू प्रोजेक्टस् इंटरनॅशनल लिमीटेड कडुन लोकमान्य नगर ते हिंगणा गावापर्यत महाराष्ट्र मेट्रो रेलची उभारणी करणार आहे. सदरील कामादरम्यान झोन चौक ते आय सी. चौक पर्यत मेट्रो मार्गाचे बांधकाम करण्याकरीता वाहतूक वळविणे आवश्यक आहे, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**इंडियन ऑयल पेट्रोल पंप ते झोन चौकाकडे जाणारा मुख्य रस्ता बंद करण्यात येत असून वाहतूक खालील प्रमाणे मार्गावर वळविण्यात येत आहे.**

- हिंगणा कडून नागपूर कडे जाणारी वाहतूक हि इंडियन ऑयल पेट्रोल पंप कडुन सर्व्हीस रोडने झोन चौक पर्यत जातील.

**सदरची अधिसूचना दिनांक १४.०६.२०२६ ते दि. ०७.०७.२०२६ पावेतो अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

( आदित्य मिरखेलकर, **भापोसे** )
पोलीस उप आयुक्त वाहतुक,
नागपुर शहर.